जा. क्र./प्र.स्त्री./        /२०२४
दिनांक: २५/०६/२०२४

प्रति,
मा. अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,
जळगाव.

**विषय: आंतरराष्ट्रीय योग दिवस विशेष गर्भिणी योग शिबिर.**

मा. महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून  दिनांक 20/06/2024 गुरुवार रोजी  शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय जळगाव, येथील स्त्रीरोग व प्रसूती तंत्र विभागांतर्गत गर्भिणी योग शिबिर आयोजित करण्यात आले होते.

यामध्ये गर्भिणी परीक्षण, प्रयोगशालीय परीक्षण, योग प्रशिक्षण व उपचार याचे शिबिर घेण्यात आले. या शिबिरामध्ये 75 गरोदर मातांची तपासणी (ANC Check up Wt,BP, FHS, CBC etc) करून आवश्यक ते औषधोपचार देण्यात आले. त्याचप्रमाणे स्त्रीरोग तज्ञांच्या देखरेखीखाली सर्व रुग्णांचे वेगवेगळ्या पद्धतीने योग प्रशिक्षण घेतले. योग प्रशिक्षण संपल्यानंतर सर्व रुग्णांना उत्तम दर्जाचे, रुचकर भोजन देण्यात आले.

या शिबिरासाठी माननीय अधिष्ठाता व आयुष संचालक डॉ. रामन घुंगराळेकर सर यांचे मार्गदर्शन आणि मोलाचे सहकार्य लाभले.

या शिबिराचे आयोजन करण्याचे ठरविल्यापासून शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. अहिरे सर आणि निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. मिलिंद कांबळे सर यांनी खूप महत्त्वाची भूमिका पार पाडली. जसे की,

- रुग्णांना ने आण करण्यासाठी ॲम्बुलन्स उपलब्ध करून देणे
- पॅम्प्लेट, माहिती पुस्तिका छापण्याची परवानगी देणे
- 100 रुग्णांसाठी आंतर रुग्ण विभाग तयार करण्याचे आदेश देणे
- प्रयोगशालीन परीक्षण
- सर्व औषधी उपलब्ध करून देणे
- रुग्णांसाठी सकस आहार उपलब्ध करून देणे
- त्याचप्रमाणे सर्व रुग्णांना आपल्या रुग्णालयाबाबत जागरूकता देणारे, माहिती देणारे मनोगत व्यक्त करणे इ.

ऐनवेळी रुग्णांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्यामुळे अचानक रुग्ण संख्या वाढली. अशावेळी अल्प कालावधीमध्ये आमच्या विनंतीला मान देऊन कायचिकित्सा विभागाने शिबिराचे आयोजन करण्यासाठी आम्हाला खूप मदत केली. डॉ. शर्मिली सूर्यवंशी मॅडम, डॉ. संदीप सुसे, डॉ. माधुरी नेहते आणि विभागातील सर्व अंतर्वासियता प्रशिक्षणार्थी यांनी रुग्ण परीक्षण करण्यात मदत केली.

स्त्रीरोग प्रसुतीतंत्र विभागाचे अंतरवासियता प्रशिक्षणार्थी Batch A यांनी उत्कृष्टरित्या शिबिराचे पूर्वनियोजन केले. घरोघरी जाऊन पेशंटला शिबिरासाठी येण्यास तयार केले. शिबिर स्थळाचे सुशोभीकरण करणे रुग्णांना त्यांच्या गावापासून ने-आण करणे, योगाचे प्रात्यक्षिक करून दाखवणे, रुग्णांची तपासणी करणे, आपल्या रुग्णालयामध्ये उपलब्ध असणाऱ्या सगळ्या सुविधांची माहिती देणे इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण कार्य या विद्यार्थ्यांनी केले.

याप्रसंगी डॉ. सोनाली फराटे यांनी रुग्णांना योग बद्दल संपूर्ण माहिती दिली. डॉ. स्वाती बळी यांनी गर्भसंस्कार, गर्भावस्थेतील आहार विहार इत्यादी बद्दल माहिती दिली. यावेळी रुग्णांना ओंकार, ध्यान, ताडासन, वज्रासन, भद्रासन, शवासन, उत्कटासन, बालासन, गर्भसंस्कार इत्यादींची सखोल माहिती देण्यात आली.

**विभाग प्रमुख**
**प्रसूतितंत्र व स्त्रीरोग विभाग**
**शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,**
**जळगाव.**

<u>आंतरराष्ट्रीय योग दिवस विशेष गर्भिणी योग शिबिर कार्यक्रमाचे फोटो (२०/०६/२०२४)</u>














